# पट्टणच्या घाटात ट्रॅक्टर पलटी होऊन दोघांचा मृत्यू

## तीन जण गंभीर जखमी



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.8 )-** शेणखताने ट्रॅक्टर भरून परत येत असताना पट्टणच्या घाटात अचानक ट्रॅक्टर पलटी होऊन दोन जणांचा घटनास्थळावरच मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले. ही घटना रविवार दि. 8 ला सकाळी 10.30 वाजताच्या सुमारास घडली. यातील मृतक हे बेनोडा व जरूड येथील रहिवाशी असल्यामुळे या दोन्ही गावांमध्ये एकच शोककळा पसरली आहे. या दोघांवरही अत्यंत जड अंतकरणाने सायंकाळी 6 वाजताच्या दरम्यान जरूड व बेनोड्यामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार, कौशल दिलीप टेकाम (वय 23 वर्ष रा. बेनोडा शहीद) व पंकज काटसर्पे (वय 30 वर्ष रा. जरूड) असे मृतकाचे नाव आहे. एकूण पाच जण या ट्रॅक्टरवर मध्यप्रदेशातील पट्टण लगतच्या गावातून शेणखत आणण्यासाठी सकाळी गेले होते. मध्यप्रदेशातून शेण खताने ट्रॅक्टर भरून परत जरूडकडे येतांना पट्टणच्या घाटामध्ये ट्रॅक्टर पलटी झाला. या ट्रॅक्टर केबीनमध्ये दोघांचा ट्रॅक्टरखाली दबून जागेवरच मृत्यू झाला, तर अन्य तिघेजण गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरतात जरूड व बेनोड्यातील नागरिकांनी पट्टणच्या घाटाकडे धाव घेतली. नागरिकांनी मृतकांना वरुड येथील ग्रामीण रुग्णालयात आणले. यावेळी डॉक्टरांनी त्या मृतदेहाचे शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले. यातील मृतक पंकज काटसर्पे याला पत्नी व दोन लहान मुले असून त्या कुटुंबावर पंकजच्या मृत्यूमुळे दु:खाचा डोंगर कोसळला आहे. तर बेनोडा येथील कौशल टेकाम याच्या कुटुंबाचीही तशीच स्थिती आहे. अत्यंत जड अंतकरणाने या दोन्ही मृतदेहावर बेनोडा व जरूड येथे सायंकाळी सहा वाजताच्या दरम्यान अंत्यसंस्कार करण्यात आले. वृत्त लिहीस्तोवर या प्रकरणांमध्ये गुन्हा दाखल झाला किंवा नाही याबाबत कळू शकले नाही.

# सख्ये नातेवाईक झाले पक्के वैरी!

## दोन गटामध्ये सशस्त्र हल्ल्यात चार जण जखमी

### नांदगाव पेठ येथील घटना





**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव पेठ,( दि.8 ) -** जुन्या वैमनस्यातून येथील एका समाजातील तांबे व शिंदे या दोन कुटुंबात रविवारी सकाळी 9 वाजताच्या दरम्यान सशस्त्र हल्ला झाला. शाब्दिक वादानंतर एकमेकांवर दगडफेक करून नंतर सशस्त्र हल्ला चढविल्याने घटनेत चार जण गंभीर जखमी झालेत. या घटनेने शासकीय वसाहत परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.घटनास्थळी दंगा नियंत्रण पथक तसेच पोलिसांचा ताफा तैनात करण्यात आला होता. वरिष्ठ पोलीस अधिकारी सुद्धा घटनास्थळी दाखल झाले होते.

घटनेची सविस्तर हकीकत अशी की, दादाराव सुभाष शिंदे व मंगेश धर्मा तांबे या दोघांमध्ये जुन्या कारणावरून रविवारी सकाळी वाद झाला.वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्यानंतर दादाराव व रघुनाथ शिंदेने मंगेश व ईश्वर शिवराम तांबे यांच्यावर सशस्त्र हल्ला चढविला. अशातच मंगेश तांबेवर चाकूचे वार करण्यात आले.ही घटना घडताच पसिरात एकच खळबळ उडाली. माहिती मिळताच नांदगावपेठचे ठाणेदार महेंद्र अंभोरे तातडीने आपल्या ताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी चारही जखमी दादाराव सुभाष शिंदे, रघुनाथ शिंदे, मंगेश धर्मा तांबे, ईश्वर शिवराम तांबे यांना जिल्हा रूग्णालयात दाखल केले. परिसरात पुन्हा तनाव निर्माण होऊ नये म्हणून येथे दंगा नियंत्रण पथकासह अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला. डीसीपी गणेश शिंदे, फ्रेजरपुरा विभागाचे एसीपी कैलाश पुंडकर हे देखील घटनास्थळी दाखल झाले. याबाबत दादाराव शिंदे व मंगेश तांबे यांनी परस्परविरोधी तक्रारी दिल्या आहे. वृत्तलिहेस्तोव नांदगावपेठ पोलिस ठाण्यात याबाबत गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

### दोन्ही कुटुंब एकमेकांचे सगेसोयरे

शासकीय वसाहत परिसरात तांबे व शिंदे परिवार अनेक वर्षांपासून राहतात. दोन्ही गट एकमेकांचे सगे-सोयरे असून यांच्यामध्ये जुन्या कारणावरून अनेक महिन्यांपासून वाद सुरू आहे. नांदगावपेठ पोलिस ठाण्यात दोन्ही गटांनी एकमेकांविरोधात तक्रारी दिल्यानंतर त्यांच्यावर परस्परविरोधी तक्रारीहुन अनेक गुन्हे दाखल आहेत. पोलिसांनी आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. तरी देखील आरोपींमध्ये अधुन-मधुन हिंसा भडकतच असते.अशातच रविवारी पुन्हा या घटनेने डोके वर काढून त्याचे मोठ्या घटनेत रूपांतर झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# पार्डी शिवारात गायीच्या वासरांची शिकार

## बिबट्याने हल्ला केल्याचा अंदाज

## परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी ( दि. 8 )** - अंजनगाव बारी लगतच्या पार्डी(देवी) येथील शिवारात मांजरी म्हसला रस्त्यावरील नाल्याच्या काठव्यालगच्या बांधलेल्या शेतात वासरांवर हिंस्त्र वन्यप्राण्यांनी जिवघेणा हल्ला केल्याची घटना शनिवारी(ता. 7) घडली. ही शिकार बिबट्याने केल्याची चर्चा आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अशोक यशवंतराव ठाकरे यांच्या पार्डी शिवारात शेत असुन या शेतामध्ये ते दररोज एक गाय व वासरू बांधत होते. शनिवार सायंकाळी साडेआठच्या सुमारास त्यांनी शेतात जाऊन पाहिले असता दोन्ही पशु (गाय व कारोड) सुरक्षित होते. त्यानंतर त्यांनी रविवारी (ता. 8)सकाळी शेतात जाऊन पाहिले असता गाईच्या वासरांची शिकार केल्याचे आढळून आले. ही शिकार बिबट्याने केल्याची शक्यता त्याच्या (बिबट्याच्या) पाऊलांच्या ठशावरून व्यक्त करण्यात येत आहे. वनविभाग पोहरा बिटचे कर्मचारी अन्सारी यांना घटनास्थळी पंचनामा केला. यावेळी बिबट्याच्या पाऊलांचे ठशे आढळून आले. परिसरात याआधी अशा घटना घडल्याचे दिसून येत असल्याने वनविभागाचा पुढील तपास सुरू आहे. वनविभागाने शेतकऱ्यांना सतर्क व सजग राहण्याचे आवाहन केले आहे.

# मडकी येथे शेतकऱ्याची आत्महत्या

## दोन लाखाची कर्ज तसेच सततच्या नापिकीला कंटाळून आत्मघातकी निर्णय

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.8 ) –** चिखलदरा तालुक्यातील मडकी येथे युवा शेतकऱ्याने गळफास लावून आत्महत्या केली. राजा मधु नाईक (वय 35 रा. मडकी) असे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे. आज सकाळी आठ वाजता या शेतकऱ्याने गळफास लावला.

शेतकऱ्याच्या वडिलांच्या नावाने युनियन बँक चिखलदरा यांचे दीड लक्ष रुपयांचे कर्ज होते, तसेच खाजगी कर्ज 50 हजार रुपये होते तसेच अतिवृष्टीमुळे व निसर्गाच्या लहरी धोरणामुळे यावर्षी सोयाबीनचे पीक उत्पादन सुद्धा अतिशय कमी झाले. सततच्या नापकीमुळे त्रस्त होऊन या युवा शेतकऱ्याने आत्महत्या केली. शेतकऱ्याने स्वत:च्या शेतामध्ये झाडाला लटकून आत्महत्या केली.

मृत शेतकऱ्याचे मृतदेह पोस्टमार्टम साठी चिखलदरा ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. पोस्टमार्टम करून मृतदेह नातेवाईकांच्या हवाली करण्यात आले. मृतक शेतकऱ्याच्या पश्चात पत्नी, दोन मुले, आई, वडील, भाऊ असे कुटूंब आहे.

# चाकु घेऊन नागरिकांमध्ये दहशत पसरविणाऱ्या दोघांना अटक

## कोतवाली व गाडगेनगर हद्दीतील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि. 8 )-** चाकु हातात घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणार्या दोन तरुणांना पोलिसांनी 8 डिसेंबर रोजी अटक केली. कोतवाली व गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत या घटना घडल्या आहेत.

8 डिसेंबर रोजी कोतवाली पोलिस पेट्रोलिंग करीत असताना, त्यांना गुप्त माहिती मिळाली की, बस स्टँड परिसरामध्ये एक इसम अवैद्य रितीने हातात चाकू घेऊन नागरिकांध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करीत आहे. या माहितीवरून पोलिसांचे पथक तत्काळ घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी आरोपी महेंद्र हरिचंद सरकटे (35, वर्षे रा.बेलपूरा, अमरावती) याला ताब्यात घेऊन, त्याच्याजवळील एक लोखंडी चाकू जप्त केला. याप्रकरणात आरोपीविरुद्ध कलम 4/25 हत्यार कायदा सह कलम 135 महाराष्ट्र पोलिस कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात आली. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके, पोलिस निरीक्षक विजया पंधरे, एएसआय रंगराव जाधव, मलिक अहमद, सुनील हुलगडे, आशिष इंगळेकर, प्रमोद हरणे यांनी केली.

### गाडगेनगरात सराईत गुन्हेगाराजवळ सापडला चायना चाकू

8 डिसेंबर रोजी गाडगेनगर पोलिस विलासनगरात पेट्रोलींगकरीत असताना, त्यांना वेअर हाँऊस समोर एक तरुण चाईना चाकु लावुन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करीत असल्याचे दिसून आले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन, त्याच्याजवळील शस्त्र जप्त केले. जय विजयकुमार शर्मा (40 वर्षे, रा. शोभा नगर, गल्ली शितल किराणा दुकाना मागे.) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून चायना चाकु जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त सागर पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त अरुण पाटील व पोलिस निरीक्षक ब्रम्ह गीरी यांच्या मार्गदर्शनाखाली डी. बी. पथक प्रमुख सहायक पोलिस निरीक्षक रमेश बाबर, पोलिस हवालदार निलेश जुनघरे, गजानन बरडे, संजय भिलाये, सागर धरमकर, सुशांत प्रधाण यांनी केली.

# राष्ट्रीय शालेय कब्बडी स्पर्धा आजपासून

**अमरावती** - जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे 14 वर्षाखालील मुला-मुलींची 68वी राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सोमवार, दि. 9 ते दि. 12 डिसेंबरपर्यंत या क्रीडास्पर्धा विभागीय क्रीडा संकुलातील इनडोअर हॉलमध्ये चालणार आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी कळविले आहे.

# बॉटलमध्ये पेट्रोल, रॉकेल टाकून स्फोटाची बनविली रिल

## व्हीडीओ व्हायरल करणाऱ्या तरुणाविरुध्द गुन्हा दाखल ■ राजापेठ हद्दीतील मॉलमधील प्रकाराची पोलिसात तक्रार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 8 ) -** बॉटलमधील पेट्रोल व रॉकेलद्वारे स्फोट करून व्हीडीओ तयार करणे आणि तो व्हीडीओ सोशल मिडियावर व्हायरल करणे, एका तरुणाला चांगलेच महागात पडले आहे. तरुणाच्या या प्रतापामुळे नागरिकांच्या जीवाताला हानी होण्याची शक्यता होती. ही बाब लक्षात घेता मॉलचे मॅनेजर रविकुमार नरेशप्रसाद (44, रा. रायपूर, राज्य छत्तीसगड) यांनी 7 डिसेंबर रोजी राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी आरोपी सैय्यद अवेन सैय्यद नासीर (19, रा. रा. हनुमाननगर) याच्याविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

रविकुमार नरेशप्रसाद यांच्या तक्रारीनुसार, ते एका मॉलमध्ये मॅनेजर पदावर कार्यरत आहेत. ते सकाळी 10 वाजता ड्युटीवर येतात आणि रात्री 8 वाजता घरी जातात. परंतू गेल्या काही दिवसापांसून मॉलमध्ये एक अनोळखी मुलगा रात्रीदरम्यान पेट्रोलची बॉटल घेऊन स्फोट घडवून आणत असल्याचे निदर्शनास आले. या स्फोटामुळे लघुशंका करणारे भयभित होऊन ओरडतात. तसेच बाथरुममधील शौचालयाच्या कंमोडमध्ये रॉकेल टाकून ते पेटवितो. त्यामुळे कंमोडवर बसलेला व्यक्ती घाबरून ओरडत बाहेर येतो. याप्रकाराचा व्हीडीओ तो तरुण बनवून फेसबुक, युट्युब तसेच इन्स्टाग्रामवर लोड करीत असल्याचे मॉलच्या मॅनेजरच्या लक्षात आले. हे व्हीडीओ सुरक्षा रक्षक तसेच अन्य नागरिकांच्या फेसबुक व युट्युबवर व्हायरल झाल्याचे दाखविण्यात आले. रात्रीच्या दरम्यान घडणारा हा प्रकार मानवी जीवीतास धोकादायक ठरण्याची शक्यता आहे. हा प्रकार पाहून मॉलचे मॅनेजर रविकुमार नरेशप्रसाद यांनी राजापेठ पोलिस ठाणे गाठून याबाबतची तक्रार नोंदविली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# बस प्रवासात दोन महिलांचे लाखोंचे दागिने उडविले

## चांदुररेल्वे व कुऱ्हा हद्दीतील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 8 ) -** बस प्रवासादरम्यान दोन महिलांच्या पर्समधील लाखो रुपयांचे सोन्याचे दागिने चोराने लंपास केले. चांदुररेल्वेत एका 60 वर्षीय महिलेच्या बॅगेतून मोबाईल व मंगळसुत्र असा एकुण 2 लाख 5 हजाराचा ऐवज चोराने लंपास केला आहे, तर कुर्हा येथे एका महिलेच्या पर्समधील रोख व सोन्याचे मंगळसुत्र असा एकुण 1 लाख 76 हजार रुपये किमंतीचा ऐवज चोराने लंपास केला आहे. या घटनेच्या तक्रारीवरून चांदुररेल्वे व कुर्हा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

60 वर्षीय महिला चांदुररेल्वे बसस्थानकावरून बसमध्ये चढत होती, त्यावेळी तिच्या बॅगमधील मोबाईल व सोन्याचे 2 ग्रॅमचे मंगळसूत्र असा एकुण 2 लाख 5 हजाराचा मुद्देमाल चोराने लंपास केला. या महिलेच्या तक्रारीवरून चांदुररेल्वे पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. तर कुर्हा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मार्डी येथील रहिवासी महिला लग्नाकरिता अमरावती ते आर्वी बसने प्रवास करीत होती. दरम्यान तिच्या पर्समधून चोराने 1 हजाराची रोख व 35 ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेले. या घटनेची तक्रार महिलेने अमरावती शहरातील कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून, ती तक्रार कुर्हा पोलिस ठाण्याकडे वर्ग करण्यात आली आहे. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# चिकन पेक्षाही भाव खातेय हरभऱ्याची भाजी



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.8 ) –** हिवाळ्याच्या काळात शेतात रब्बी हंगामात तेलवन करडई, कडधान्य हरभऱ्याची लागवड करतात. या पिकाची कोवळ्या पानांची भाजी ग्रामीण भागासह शहरीतील नागरिक मोठ्या आवडीने आवर्जुन खातात. असल्याने कडाक्याची थंडीमुळे पहाटे हरभऱ्याच्या पानांवर खार (आंब) पडली की मग भाजीसाठी हरभऱ्याचे कोवळे शेंडे खुडले जातात. ही खुडलेली हरभऱ्याची भाजी ग्रामीण भागातील काही शेतकरी परिसरातील भाजी बाजारामध्ये विक्रीला घेऊन येत आहेत.

फक्त थंडीच्या दिवसांत मिळणाऱ्या व भरपूर जीवनसत्व आणि पोषणमूल्य असलेल्या या भाजीला ग्राहकांकडून मोठी मागणी असते. या भाजीची आवक कमी व मागणी जास्त असल्यामुळे या भाजीला इतर भाज्यांपेक्षा सर्वाधिक भाव मिळतो. सध्या हरभऱ्याच्या कोवळ्या पानांची ही भाजी 50 ते 60 रुपये पाव किलो या दराने विक्री होत आहे.

इतर सर्व पालेभाज्या दहा ते पंधरा रुपये प्रति जुडी या दराने विकल्या जात असताना हरभऱ्याची भाजी मात्र 200 240 रुपये प्रति किलो या दराने विक्री होत आहे. तर ब्रॉयलर चिकन सध्या 200 रुपये प्रति किलो प्रमाणे विक्री होत आहे. एकंदरीतच दराची तुलना केली असता चिकन पेक्षाही हरभऱ्याची भाजी जास्त भाव खात असल्याचे चित्र दिसून येत आहे. हरभराच्या भाजीवर खार पडत असल्याने भाजी खुडताना हाताची बोटे काळी पडतात. जरा जास्त वेळ भाजी खुडली तर हाताच्या बोटांना भेगा ही पडतात. तरी देखील इतर भाज्यांपेक्षा हरभऱ्याच्या भाजीला चांगला भाव मिळत असल्यामुळे आमच्या कष्टाचे चीज झाल्यासारखे वाटते असे भाजी विक्रीस आणणाऱ्याळ महिला विक्रेत्याने सांगीतले.

पोटदुखीवर औषध म्हणून पुर्वी लोक क्षार खार गोळा करायचे. संध्याकाळी एक स्वच्छ कापड हरभर्यानच्या झाडावर झाकुन ठेवायचे पहाटेच्या धुक्याने ते कापड ओले होते. ह्या ओल्या कापडाला खार चिकटलेली असते. तर ते कापड पिळून पिशवित भरुन ठेवतात.

### आरोग्यासाठी फायदेशीर

हरभरा भाजीमध्ये कोलेस्टेरॉल नसते. हे हार्टच्या आजारात बचाव करते. यामध्ये अधिक प्रमाणात पोटॅशियम असल्याने रक्तदाब नियंत्रणात राहतो. तसेच कॉपर आणि झिंकमुळे त्वचेची चमक वाढते. हरभरा वनस्पतींचे सर्व भाग उपयुक्त असून, बियांत प्रथिने व कार्बोहायड्रेट्स तसेच जीवनसत्त्वे भरपूर प्रमाणात असतात. जेवणामध्ये हरभऱ्याचा कोवळा पाला, पीठ व डाळ यांचा भरपूर उपयोग करतात. हरभऱ्याच्या भाजीत भरपूर प्रोटीन आणि कॅल्शियम असते. यामुळे हाडे आणि स्नायू मजबूत होतात. हरभरा भाजीमध्ये असलेला कार्बोहायड्रेट शरीराचा थकवा दूर होऊन ऊर्जा मिळते. तसेच भाजीतील आयर्न हे रक्ताच्या कमतरतेपासून बचाव करते. त्यामुळे हरभऱ्याची भाजी आरोग्यासाठी लाभदायक असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.

# महिलेची छेड काढणाऱ्या इसमाविरुद्ध गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.8 )-** एका 25 वर्षीय महिलेची छेड काढल्या प्रकरणी थडी पवनी येथील श्याम पालीवाल नामक इसमाविरुद्ध पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस सूत्रानुसार, फिर्यादी महिला ही वरुड येथील शिवण क्लास केंद्र येथे गेल्या एक महिन्यापासून क्लास करीत आहे. घटनेच्या दिवशी म्हणजे 5 नोव्हेंबरला सायंकाळी सात वाजताच्या सुमारास ही महिला ऑटोने राजुरा बाजार येथे आली व त्यातून थडी पवनीचा आटो मिळाल्याने ऑटोमध्ये मधल्या सीटवर बसून थडी पवनी येथे जात असताना राजुरा बाजार ते वाडेगाव दरम्यान वडाळा फाट्याजवळ आटो मधील मागील सीटवर बसलेल्या श्याम पालीवाल याने फिर्यादीच्या पाठीला व कमरेला हात लावला तसेच लज्जा निर्माण होईल असे अश्लील कृत्य करून लैंगिक छळवणूक करून विनयभंग केला तसेच फिर्यादीच्या पतीस फोन करून घडलेली हकीकत सांगितली असता आरोपीने तू कोणाला फोन लावते? कोण काय करते पाहून घेईल अशी धमकी दिली याप्रकरणी फिर्यादी महिला तिचे तक्रारीवरून वरुड पोलिसांनी श्याम बालकिसन पालीवाल रा. थडी पवनी ता. नरखेड जिल्हा नागपूर यांचे विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून घटनेचा पुढील तपास वरुड पोलीस करीत आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# खगोलप्रेमींसाठी पर्वणी! 13 अन् 14 डिसेंबरला जेमिनिड्सचा उल्का वर्षाव

**खगोलीय घटना** दर तासाला निर्माण होणार किमान 120 उल्का



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 8 )** - 13 व 14 डिसेंबरच्या रात्री आकाशात पूर्व दिशेला उल्का वर्षाव होताना दिसेल. याला जेमिनिड्चा उल्का वर्षाव (Geminids Meteor Shower) म्हणतात. हा लघुग्रह व 3200 फेथॉन नावाच्या छोट्याशा खगोलीय वस्तूंमुळे तयार होतो. ही वस्तू धुमकेतू व लघुग्रह यामधली एक मानली जाते.

हा उल्का वर्षाव खगोलप्रेमी व अभ्यासकांना साध्या डोळ्यांनी पाहता येणार असल्याची माहिती खगोल अभ्यासकांनी दिली. अंधाऱ्या रात्री आकाशाचे निरीक्षण करीत असताना क्षणार्धात एखादी प्रकाशरेषा चमकून जाताना आपण पाहतो. या घटनेस 'तारा तुटला' असे म्हटले जाते; परंतु तारा कधीही तुटत नाही. ही एक खगोलीय घटना आहे व यालाच 'उल्का वर्षाव' म्हणतात.

उल्काचे निरीक्षण व शास्त्रीय नोंदी याची खगोल जगतात खूप गरज आहे. त्यामुळे बाह्य अवकाशातील वस्तूचे नमुने या उल्केमुळे आपणास मिळतात व यामुळे वस्तूच्या जडणघडणेचा अर्थ लावता येतो. या उल्का वर्षावाचे विलोभनीय दृश्य अवश्य बघावे, असे आवाहन मराठी विज्ञान परिषदेचे विभागीय अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय गिरूळकर यांनी केले आहे.

**हे तर धुमकेतू, लघुग्रहाचे अवशेष**

जेमिनिड्स उल्का वर्षाव हा 3200 फेथॉन नावाच्या एका छोट्या खगोलीय वस्तूमुळे होतो. ही वस्तू धूमकेतू आणि लघुग्रह यांच्यामधील एक प्रकार मानली जाते. धुमकेतू किंवा लघुग्रह सूर्याला प्रदक्षिणा मारत असताना त्यातील काही भाग मोकळा होतो. हे त्यांचे अवशेष आहेत. याबाबत काही अंधश्रद्धा असल्या तरी याला खगोलशास्त्रात कुठेही थारा नाही.

# पांढरी घुबड जखमी अवस्थेत आढळली

**धामण सापाचे रेस्क्यू**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 8 )**- शहरातील राजापेठ परिसरात पांढरी घुबड जखमी आढळून आली, तर लक्ष्मीनारायणनगरात धामण प्रजातीचा साप जखमी अवस्थेत आढळून आला आहे. या दोन्ही वन्यप्राण्यांना वॉर संस्थेच्या रेस्क्यू चमुने सुरक्षितरित्या पकडून वनविभागाच्या स्वाधीन केले.

राजापेठ परिसरातील पाटील कोचींग क्लॉसेसच्या अपार्टमेंटमध्ये 8 डिसेंबर रोजी सकाळच्या सुमारास पांढरी घुंबड जखमी अवस्थेत पडली होती. याबाबत माहिती मिळताच वॉर संस्थेचे अध्यक्ष निलेश कंचनपूरे यांच्या मार्गदर्शनात वन्यप्रेणी पवन भेरडे, अभिजित येलगुंदे व जयस्वाल यांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन पांढर्या घुंबडाला सुरक्षितरित्या पकडले. त्यानंतर त्यांनी घुंबडाला पशु वैद्यकीय अधिकार्याकडे नेऊन तपासणी केली. याबाबतची माहिती वनविभागाला देण्यात आली. औषधोपचारानंतर घुंबडाला वडाळी येथील प्राणी केअर सेन्टरवर ठेवण्यात आले. त्याचप्रमाणे लक्ष्मीनारायणनगरात धामण प्रजातीचा साप जखमी अवस्थेत आढळून आला. सापाच्या तोंडावरून वाहनाचे चाक गेल्यामुळे तो जखमी अवस्थेत पडून होता. या घटनेच्या माहितीवरून सर्पमित्र ऋतिक उईके यांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन सापाला रेस्क्यु केले. सापाला जंगलात सोडण्यात आले आहे. यावेळी वनविभागाचे वनपाल बाबुराव खैरकर उपस्थित होते.

# निम्न पेढी प्रकल्पाच्या पूनर्वसनाला गती द्यावी -जिल्हाधिकारी सौरभ कटियार






**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.8 )** - निम्न पेढी प्रकल्प राज्याचा प्राधान्याचा प्रकल्प आहे. त्यामुळे या प्रकल्पात बाधीत गावांचे तातडीने पूनर्वसन करण्यासाठी पावले उचलण्यात यावी. तसेच पूनर्वसनासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आलेल्या गावातील शासकीय सेवा पूनर्वसीत गावात स्थलांतरीत करून सुरू कराव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात निम्नपेढी प्रकल्पाचा आढावा घेण्यात आला. यावेळी उपजिल्हाधिकारी अमर राऊत, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर आदी उपस्थित होते.

कटियार यांनी, प्रकल्पाचे काम सुरू करण्यासाठी बाधीत गावातील नागरिकांचे स्थलांतर होणे आवश्यक आहे. पूनर्वसित गावात सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, प्रामुख्याने पिण्याच्या पाण्याची सोय प्राधान्याने करण्यात यावी. नागरिकांनी स्थलांतरीत होण्यासाठी यंत्रणांनी लक्ष केंद्रीत करावे. तसेच याठिकाणी असलेल्या सार्वजनिक सेवा स्थलांतरीत करून नवीन गावात सुरू कराव्यात. प्रकल्पाला गती येण्यासाठी तातडीने नोटीस प्रसिद्ध करण्यात यावी. तसेच नवीन गावात ग्रामसभा घेण्यासाठी सूचना देण्यात याव्यात. स्थलांतरणासाठी मार्चपर्यंतची मुदत देण्यात यावी. दोन गावांच्या पूनर्वसनासाठी खासगी जागेचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात यावी. यात जागेची निश्चित होऊन ग्रामसभेत ठराव घेण्यात यावा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

# स्व.वृषभ गावंडे व स्व. सोपान कोरडे स्मृतिप्रित्यर्थ रक्तदान शिबिर आज

**आनंद सभागृह येथे प्रहारचे आयोजन**

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार,( दि.8 )** - प्रहारचे कट्टर कार्यकर्ते स्व.ऋषभ गावंडे व स्व.सोपान कोरडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सोमवारी( दि.9 ) आनंद सभागृह चांदुर बाजार येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. गत काही दिवसांपूर्वी या दोन्ही प्रहार कार्यकर्त्यांचा वाहन अपघातात मृत्यू झाला होता. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्याच्या निमित्ताने प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने सोमवारी सकाळी 10 वाजता माजी आ. बच्चू कडू यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.





प्रहार जनशक्ती पक्ष हा सेवेच्या माध्यमातुन मोठा झाला असून जिल्ह्यातील अनेक रुग्णसेवक व प्रहार कार्यकर्त्यांच्या माध्यमातून प्रहारला नेहमीच बळ मिळाले आहे.स्व. ऋषभ गावंडे व स्व. सोपान कोरडे हे दोन्ही कार्यकर्ते प्रहारचा आधारस्तंभ होते. चांदुर बाजार, अचलपूर तालुक्यात या दोन्ही कार्यकर्त्यांनी रुग्णसेवेच्या माध्यमातून निरंतर जनसेवा व रुग्णसेवा केली. विधानसभा मतमोजणीच्या दिवशी काळाने घाला घालून प्रहारच्या या दोन्ही कार्यकर्त्यांना हिरावून घेतले. प्रहार पक्षासाठी ही मोठी हानी असून त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ व त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्याच्या हेतूने सोमवारी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. या रक्तदान शिबिरात प्रहार कार्यकर्त्यांनी तसेच नागरिकांनी सहभागी होऊन मोठ्या प्रमाणात रक्तदान करण्याचे आवाहन प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.शिबिराच्या अधिक माहितीसाठी निखिल ठाकरे 9673925259 तसेच ऋषीकेश पोहोकार 8390250509 या क्रमांकावर संपर्क साधण्याचे सुद्धा आवाहन करण्यात आले आहे.

## रब्बी हंगामातील 5 पिकांसाठी पीक स्पर्धा

**अमरावती** - नवनवीन प्रयोगाद्वारे कृषी उत्पादनामध्ये भर घालणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांचे मार्गदर्शन परिसरातील शेतकऱ्यांना होण्याच्या उद्देशाने कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम-2024 मध्ये विविध 5 पिकांसाठी राज्यांतर्गत पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. ज्वारी, गहु, हरभरा, करडई व जवस पिकांसाठी अमरावती विभागातील जास्तीत-जास्त शेतकऱ्यांनी या पीक स्पर्धेत भाग घ्यावा, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक प्रमोद लहाळे यांनी केले आहे. सर्वसाधारण व आदिवासी गटामध्ये 31 डिसेंबर 2024 पर्यंत शेतकऱ्यांना ज्वारी, गहु, हरभरा, करडई व जवस या पिकांसाठी पीक स्पर्धेमध्ये अर्ज करता येणार आहे.

# दहावी, बारावीचे अंतिम वेळापत्रक जाहिर

**अमरावती** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे दहावी आणि बारावीच्या परिक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहिर केले आहे. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इयत्ता बारावी परीक्षा सर्वसाधारण, द्विलक्षी व व्यवसाय अभ्यासक्रम, तसेच माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांची ऑनलाईन परीक्षा मंगळवार, दि. 11 फेब्रुवारी, 2025 ते दि. 18 मार्च 2025, प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच एनएसक्यूएफ अंतर्गत व्यावसायिक अभ्याक्रम प्रात्यक्षिक परीक्षा शुक्रवार, दि. 24 जानेवारी 2025 ते सोमवार, दि. 10 फेब्रुवारी 2025, माध्यमिक शालन्त प्रमाणपत्र इयत्ता दहावी परीक्षा शुक्रवार, दि. 21 फेब्रुवारी, 2025 ते सोमवार, दि. 17 मार्च, 2025, प्रात्यक्षिक श्रेणी, तोंडी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा सोमवार, दि. 3 फेब्रुवारी, 2025 ते गुरूवार, दि. 20 फेब्रुवारी, 2025 या कालावधीमध्ये आयोजित केली आहे. परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या mahahsscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा केवळ माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय यांच्याकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम राहणार आहे. सदर छापील वेळापत्रकावरूनच परीक्षेच्या तारखाची खात्री करून विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सअॅप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी, असे माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख यांनी कळविले आहे.

# अतिवृष्टीचे अनुदान द्या, अन्यथा उपोषण!

**कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बबलू पावडे यांचा इशारा**



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.8 )** - अतिवृष्टी चे दोन हजार चे वर शेतकऱ्यांचे अनुदान मिळणे बाकी आहे, ते अनुदान अजून मिळाले नाही, हे अनुदान सात दिवसाच्या देण्यात यावे अन्यथा पंचायत समितीचे माजी सभापती विक्रम ठाकरे यांच्या नेतृत्वात उपोषण करण्याचा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती इशारा यांनी दिला आहे.

वरूड तालुक्यात जानेवारी ते मे 2024 या कालावधी मध्ये गारपीट झाले होते, त्या गारपीट चा सर्व्हे होऊन ज्या-ज्या भागात गारपीट झाले त्या भागात अनुदान जाहीर केले व सर्व शेतकऱ्यांना व्ही के नंबर देऊन त्यांना केवायसी करण्याचे सांगितले. सर्व पात्र शेतकऱ्यांनी केवायसी केले परंतु चार महिन्याचे वर कालावधी लोटून सुद्धा आज पर्यंत शेतकऱ्यांचे खात्यात गारपीट अनुदानाची रक्कम जमा झाली नाही. यामध्ये तहसील प्रशासनाकडून अनेक कारणे सांगून शेतकऱ्यांना परत करण्यात आले. शेतकरी रोज तहसील कार्यालयाचे उंबरठे झिजवित आहे. मात्र शेतकऱ्यांचे पैसे जमा होत नाही, प्रशासनाच्या अडेलतट्टु धोरणामूळे शेतकऱ्यांची मोठी निराशा होत आहे. शेतकऱ्यांचे अनुदान कसे खात्यात जमा होईल यासाठी प्रशासन कोठेच प्रयत्नशील दिसत नाही, तसेच शेतकऱ्यांना मिळावे शेतकऱ्यांना गारपीट चे व अतिवृष्टी चे अनुदान न दिल्यास विक्रम ठाकरे यांचे नेतृत्वात उपोषण बसेल असा इशारा कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभापती नरेंद उर्फ बबलू पावडे यांनी शासनाला व प्रशासनाला दिला आहे.

# आयटीआयमध्ये आज उमेदवारी भरती मेळावा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.8 )** - अमरावती येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सोमवार, दि. 9 डिसेंबर रोजी सकाळी 10 वाजता प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा आयोजित करण्यात आला आहे. भरती मेळाव्यात जॉन डिरे इंडिया प्रायव्हेट लिमिटेट, पुणे तसेच जिल्ह्यातील स्थानिक कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

या भरती मेळाव्यासाठी आयटीआय आर्किटेक्चर, ड्राफ्टस्मन, सिविल ड्राफ्टस्मन, मेकॅनिक ड्राफ्टस्मन, फिटर, वायरमन, टर्नर, मशिनिस्ट, वेल्डर, इलेक्ट्रिशियन, कारपेंटर, इलेक्ट्रॉनिक्स, अकाऊटंट, सुइंग टेक्नॉलॉजी, ड्रेस मेकिंग, फॅशन टेक्नॉलॉजी, कोपा, ट्रॅक्टर मेकॅनिक, डिझेल मेकॅनिक आणि मोटर मेकॅनिक व्यवसाय उत्तीर्ण उमेदवारांनी सहभागी व्हावे. प्रशिक्षणार्थ्यांनी बायोडाटा आणि मूळ कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती सोबत आणणे आवश्यक आहे. या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपसंचालक, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार यांनी केले आहे.

# 3 वर्ष न झालेल्या शिक्षकांना बदलीतून वगळा!

**मेळघाट मधील कंत्राटी शिक्षकांचे वेतन तत्काळ दया!**

**प्रा.शिक्षक समितीचे शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.8 )**- 3 वर्ष न झालेल्या शिक्षकांना बदलीतून वगळा, मेळघाट मधील कंत्राटी शिक्षकांचे वेतन तत्काळ द्या, आदी मागण्याकरिता महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक)अरविंद मोहरे यांना गुरुवारी (दि.5) निवेदन देण्यात आले.

निवेदनात सांगितले की, टप्पा क्रमांक 7 मधून ज्या शिक्षाकांची सेवा सर्वसाधारण क्षेत्रात 10 वर्षे झाली, परंतु कार्यरत शाळेवर 3 वर्षे व्हायची आहे, अशा शिक्षकांना टप्पा क्रमांक 7 मधून वगळण्या यावे, पेसा क्षेत्र अंतर्गत, पं. स.धारणी व पं. स.चिखलदरा मधिल शाळांवर जे कंत्राटी शिक्षक भरती करण्यात आली, त्या शिक्षक बंधू भगिनींना आतापर्यंत एकही महिन्याचे मानधन मिळाले नाही, त्यामुळे त्यांचे माहे-सप्टेंबर 2024, माहे-ऑक्टोबर 2024 व माहे-नोव्हेंबर 2024 चे वेतन काढण्याबाबत निवेदन देण्यात आले.

निवेदनामध्ये जिल्हा अंतर्गत बदली प्रक्रिया मध्ये संवर्ग 1 व संवर्ग 2 मध्ये येत असलेल्या शिक्षकांनी एकदा त्याच संवर्गातुन बदलीचा लाभ घेतला असता त्यांना पुन्हा तीन वर्षे बदलीचा लाभ घेता येणार नाही, त्यांना बदलीकरता अर्ज करता येणार नाही, अशी स्पष्ट तरतुद दि.07 एप्रिल 2021 च्या शासन निर्णयात नमुद आहे. तसेच शासकीय, अधिकारी, कर्मचारी यांच्या बदली संबंधात महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबिंब अधिनियम 2005 नुसार प्रचलितरित्या एखाद्या पदावर असण्याचा सामान्य कालावधी तीन वर्षाचा असेल, अशी तरतुद आहे. जि.प. अमरावती अंतर्गत जिल्हांतर्गत बदली प्रक्रिया सुरु झालेली आहे. दि.18 जुन 2024 च्या शासन निर्णयानुसार बदली प्रक्रिया होत आहे, या शासन निर्णयातील टप्पा क्र.7 नुसार 1.10 बदलीपात्र शिक्षक यामध्ये असे नमुद आहे की, अवघड क्षेत्रातील रिक्त जागा प्राधान्याने भरणे आवश्यक असल्याने सेवाजेष्ठता विचारात घेवुन सर्वसाधारण क्षेत्रात 10 वर्षे पुर्ण केलेल्या शिक्षकांना वास्तव जेष्ठतेप्रमाणे आवश्यकतेनुसार अवघड क्षेत्रामध्ये बदली करुन पदस्थापीत करण्यात येईल. यामध्ये कार्यरत शाळेमधील सेवेची कुठलीही अट नाही. त्यामुळे 23 नोव्हेंबर 2022 च्या पत्रांचा संदर्भ लक्षात घेवुन टप्पा क्र.7 मध्ये शिक्षकांच्या बदलीपात्र म्हणुन समावेश करतांना ज्या संवर्ग 1 व 2 मधील शिक्षकांना सर्वसाधारण क्षेत्रात 10 वर्षे पुर्ण झाली आहे, परंतु कार्यरत शाळेवर 3 वर्षे पुर्ण व्हायचे आहे. अशा शिक्षकांना टप्पा क्र.7 बदली पात्र शिक्षक% या मधुन वगळण्यात यावे, त्यांची टप्पा 7 मधुन बदली करण्यात येऊ नये.

तसेच पेसा क्षेत्र अंतर्गत, पं. स.धारणी व पं. स.चिखलदरा मधिल शाळांवर जे कंत्राटी शिक्षक भरती करण्यात आली, त्यांना आतापर्यंत एकही महिन्याचे मानधन मिळाले नाही, त्यामुळे त्यांचे माहे सप्टेंबर 2024,ऑक्टोबर 2024 व नोव्हेंबर 2024 चे वेतन लवकरात लवकर काढण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अजय पवार, माजी जिल्हा सरचिटणीस संभाजी रेवाळे, भातकुली तालुकाध्यक्ष उमेश चुनकीकर व जिल्हा सरचिटणीस शैलेंद्र स.दहातोंडे उपस्थित होते.असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# कापुस दरात काहिसे चढ उतार राहणार?

**सुताला उठाव कमी ■ पांढऱ्याल सोन्याची बाजारातील आवक जास्त**



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट ( दि.8 )**- देशात कापसाचे भाव दबावातच आहेत. कापसाला आजही देशातील बाजारात सरासरी 6 हजार 800 ते 7 हजार 300 रुपयांचा भाव मिळत आहे. तर गावखेड्यातील खरेदीत 6 हजार 500 ते 7 हजारांचा भाव मिळत आहे. कापसाच्या भावातील ही स्थिती आणखी महिनाभर राहू शकते. दरात काहिसे चढ उतारही राहण्याचा अंदाज आहे. कारण बाजारातील आवक या काळात जास्त राहील. एकदा देशातील उत्पादनाची स्थिती स्पष्ट झाल्यानंतर दरात सुधारणा होऊ शकते, असा अंदाज आहे.

सध्या बाजारात कापसाची आवक शिगेला पोचली. रोज 1 लाख 80 हजार ते 1 लाख 90 हजार गाठींच्या दरम्यान कापसाची आवक होत आहे. आवक शिगेला पोचल्यामुळेही कापूस भावावर दबाव आला. त्यातच सध्या पुढे सुताला उठाव कमी असल्याचे सांगितले जात आहे. पण अशा चर्चा शेतकऱ्यांचा माल बाजारात आल्यानंतर सुरु होतातच. त्यात नविन काही नाही. शिवाय आंतरराष्ट्रीय बाजारात कापडाला उठाव नाही, अनेक देशात आर्थिक परिस्थिती चांगली नाही, अशाही वावड्या बाजारात उठवल्या जात आहे.

यंदा देशातच उत्पादन कमी आहे. यंदा देशातील उत्पादन 300 लाख गाठींच्या दरम्यान राहील, असे सर्वांचे अंदाज आहेत. सरकारने यंदा 299 लाख गाठी उत्पादनाचा अंदाज दिला. कापूस उत्पादन आणि वापर समितीनेही 299 लाख गाठींचा अंदाज दिला. तर कॉटन असोसिएशन ऑफ इंडियाने 302 लाख गाठींचा अंदाज दिला. हा अंदाज काही दिवसात आणखी कमी होऊ शकतो. थोडक्यात काय तर सर्वच संस्थांचे अंदाज यंदा उत्पादन कमी होणार हे स्पष्ट करत आहेत. उत्पादन कमी होणार असले तर वापर वाढण्याची शक्यता आहे.यंदा उत्पादन कमी होणार असले तरी आवक सध्या जास्त आहे. त्याचा दरावर दबाव दिसून येत आहे. देशातील भाव सध्या कमी असल्यानेच आयात शक्य होत नाही. आंतरराष्ट्रीय बाजारात सध्या कापसाचे भाव कमी आहेत. मात्र आंतरराष्ट्रीय बाजारातून कापूस आयात करायचा म्हटले तरी त्या कापसाचे भाव देशातील भावाएवढेच पडतात. देशात सध्या रुईचे भाव 53 हजार ते 54 हजार रुपये प्रतिखंडीचा भाव आहे. कापसाची एक खंडी 356 किलोची असते. देशात कापूस आयातीवर 11 टक्के शुल्क आहे.

## कापसाची आवक कमी ग्रामीण भागातील खरेदी दर नीचांकी

दुसरीकडे भारताची निर्यात सध्या होत नसल्याचे सांगितले जाते. तसेच यंदा निर्यात कमी राहील, असेही अंदाज आहेत. यंदा तसेही उत्पादन कमी असल्याने निर्यात कमीच राहणार आहे. उलट भारताला आयात करावी लागणार आहे. भारत जेव्हा आयातीसाठी आंतरराष्ट्रीय बाजारात उतरेल तेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारातही भाव वाढतील. कारण भारतासारखा निर्यातदार देश कापूस खरेदी करतो म्हटल्यावर निर्यातदार देश भाव वाढवतात. इतर शेतीमालाच्या बाबतीत आपल्याला हा अनुभव याआधीही आलेला आहे.

## गरज असेल तरच कापूस द्या!

देशात जानेवारीपर्यंत कापसाची आवक जास्त असते. आवकेचा दबाव कमी झाल्यानंतर जानेवारीपासून कापसाच्या भावाला आधार मिळू शकतो. भारताची निर्यात सुरु झाल्याचाही आधार बाजाराला मिळेल. मात्र तोपर्यंत बाजारात चढ उतार राहू शकतात. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांना थांबणे शक्य आहे त्यांनी थांबायला हरकत नाही. आपला कापूस गरजेप्रमाणे टप्प्याटप्याने बाजारात विकावा. मात्र शेतकऱ्यांनी शक्यतो हमीभावाच्या खाली विक्री टाळावी. अगदी गरज असेल तर सीसीआयला कापूस द्यावा, असे आवाहन अभ्यासकांनी केले आहे.